जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

## -:प्रेस नोट :-

दिनांक :- १६/०५/२०२६

# " ट्रॅक्टर चोरट्यांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेकडून पर्दाफाश ; 2 गुन्ह्यांची उकल करून 2 ट्रॅक्टर केले जप्त "

===ooo===

एरंडोल परिसरामध्ये ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाला यश आले आहे. पथकाने कौशल्यपुर्वक तपास करत दोन संशयित आरोपींना जेरबंद केले असून, त्यांच्याकडून एरंडोल पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या वेगवेगळ्या दोन गुन्ह्यांमध्ये चोरीला गेलेले तब्बल 3,25,000/- रुपये एकूण किमतीचे दोन ट्रॅक्टर हस्तगत केले आहेत. ताब्यात घेतलेल्या संशयितांमध्ये एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे.

एरंडोल पोलीस स्टेशन गु.रजि.क्र. 44/2026 व गु.रजि.क्र. 84/2026 या लागोपाठ घडलेले ट्रॅक्टर चोरीचे गुन्हे दाखल झाल्याने घटनेचे गांर्भिय लक्षात घेता, मा. पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करण्याच्या सुचना दिल्याने. श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांनी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करुन त्यांना सदरचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणणे बाबत आदेशीत केले.

त्याअनुषंगाने सदर पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे विखरण (ता. एरंडोल) येथील **आरोपी विकी देवरे व विधीसंघर्षग्रस्त बालक** यांच्याकडे गुन्हा संदर्भात कौशल्यपुर्वक चौकशी केली असता, त्यांनी सदरचे दोन्ही गुन्हे हे त्यांचे साथीदार गणेश भिकन गोसावी व प्रविण भाईदास कोळी दोन्ही रा. विखरण, ता. एरंडोल यांचेसह केल्याची कबुली दिली.

सदर गुन्हयांत नमुद आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन **एकुण 3,25,000/- रुपये किमतीचे दोन ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहे**. तसेच इतर दोन आरोपीतांचा पोलीस पथकामार्फत कसुन शोध सुरु आहे.

**सदरची कार्यवाही कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती कविता नेरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या नेतृत्वातील पथकातील PSI जितेंद्र वल्टे, HC 2707 संदीप रमेश पाटील, HC प्रवीण जनार्दन मांडोळे, HC हरीलाल लक्ष्मण पाटील, PC राहुल नथू कोळी, HC 3375 संदीप रमेश पाटील, HC महेश मुरलीधर पाटील, PC सागर गुलाब पाटील, PC भूषण जगदीश शेलार, चापोशि बाबासाहेब पाटील या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**************************************************************************************************




SWARAJ 744 XT
NEW HOLLAND 3230